“मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास”

“Marathwadyatil Akrushi Vidyapeethat Sadar Kelelya Rajyashashtra Vishayatil Ph.D. Prabandhatil Ullekhanche Vishleshan : Ek Abhyas”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयांत आंतरविद्याशाखे अंतर्गत
पीएच्.डी. पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधन आराखडा

-: संशोधक :-

डेंगळे हरिश्चंद्र रावसाहेब

-: मार्गदर्शक :-

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती
प्राचार्य
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंडे कला महाविद्यालय, गंगाखेड
ता. गंगाखेड, जि. परभणी

-: संशोधन केंद्र :-

स्कूल ऑफ मेडीया स्टडीज,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर 2023

“मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास”

1. प्रस्तावना :

सध्याचे युग हे माहितीचे युग म्हणून ओळखले जाते. नवीन माहिती निर्माण करण्यासाठी संशोधनाची गरज असते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विषयांत संशोधनाची प्रक्रीया ही निरंतर असते. राज्यशास्त्राच्या अध्ययनाचा संबंध सुसंघटीत राज्याशी संबंधीत मानवी जीवनाशी असतो. राज्यशास्त्रात व्यक्तीच्या राज्याच्या संबंधीत ज्या राजकीय क्रिया असतात त्यांचा व राज्याच्या सार्वभौमत्वाची अभीव्यक्ती करणा-या शासनसंस्थेचा अभ्यास केला जातो. राज्यशास्त्राला शास्त्रीय स्वरूप ग्रीक विचारवंतांनी दिले. प्राचीन विचारवंत अॅरीस्टॉटल यांच्या मते, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास समाजात होत असतो. समाजातील अनेक सामाजिक संस्था कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था यांच्याद्वारे व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण होते. समाजांतील व्यक्ती व्यक्तीमधील निकोप संबंध राहण्याच्या दृष्टीने शासनसंस्था महत्वाचे कार्य पार पाडते. विशीष्ट प्रदेशातील समाज हा सरकारकडून दंडशक्तीच्या आधाराने नियंत्रीत केला जातो व अशा समाजास राज्यसंस्था असे म्हटले जाते. राज्यशास्त्र हे शासनसंस्था व राज्यसंस्था यांचा अभ्यास करणारे सामाजिक शास्त्र आहे.

राज्यशास्त्रास इंग्रजी भाषेत Politics असे म्हणतात. Politics हा शब्द मूळ ग्रीक शब्द ‘Polis’ यापासून तयार झालेला असून Polis म्हणजे नगर होय. म्हणून नगर राज्यविषयक शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय. परंतु वर्तमानस्थितीत नगरराज्ये न राहील्याने राज्यविषयक शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र असे मानण्यात येऊ लागले.

संशोधन हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो. एखादी समस्या समोर उभी राहिल्यानंतर विशीष्ट पाय-यापाय-यांचा वापर करुन ती सोडविणे. समस्येतील अनेकविध घटकांचा परस्परसंबंध शोधून त्यातून योग्य मार्ग काढणे किंवा शोधणे होय.

2) संशोधन विषयाचे महत्त्व :

सामजीक शास्त्रांना नैसर्गिक शास्त्राप्रमाणे वस्तूनिष्ठता राखणे कठीण जाते. कारण सामाजिक शास्त्रात मानवी जीवनातील भावभावना, विचार, संकल्पनाजन्य अनेक गोष्टीचा संबंध असल्यामुळे कारणांची अनेकता वाढते. सामाजिक शास्त्राचा मानवी वागणुकीशी संबंध असल्यामुळे विशीष्ट प्रयोगातून काढलेल्या निष्कर्षांना मर्यादा पडतात.

कोणत्याही सामाजीक समस्येच्या सोडवणुकीसाठी संशोधकांकडून केलेले पद्धतशीर व शास्त्रीय चिंतन म्हणजेच सामाजिक संशोधन होय. त्यासाठी संशोधकाला विशिष्ट तंत्राचा व वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करावा लागतो.

पॉलीन यंग यांच्या मते, “क्रमबद्धता, अंतर्गत संबंध, सामान्य स्पष्टीकरणे आणि नैसर्गिक नियम यांच्याद्वारे नवीन तथ्ये शोधून काढण्याची किंवा जुन्या ज्ञानाची पडताळणी घेण्याची सामाजिक संशोधन ही एक पद्धतशीर प्रक्रीया आहे.”

संशोधनाच्या बाबतीत गूणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी व गुणवत्तेत वाढ करण्यासाठी राज्यशास्त्र विषयातील शोधप्रबंधाचा अभ्यास करणे गरजेचे बनले आहे. सध्याच्या परिस्थितीत आपल्या देशातील राजकीय घडामोडीचा अभ्यास करावयाचे असल्यास वेगवेगळ्या पक्षाची ध्येय, धोरणे, राज्यानुसार सत्तेची बदलणारी परिस्थिती याचा अभ्यास देशातील सर्वच विद्यापीठात संशोधन कार्य चालू असलेले आपणास दिसून येते. राज्यशास्त्र या विषयात पण विविध समस्यांशी संबंधीत संशोधन कार्य संशोधक करीत असतात. हे संशोधन कार्य करीत असताना संशोधक विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रातील व इंटरनेटवरील माहिती शोधप्रबंध, ग्रंथ, मासिके यासारख्या मुद्रीत आणि अमुद्रीत वाचनसाहित्याचा वापर करीत असतो.

संशोधक या सर्व वापरत असलेल्या मुद्रित आणि अमुद्रित वाचनसाहित्याचा वापर करीत असतो. संशोधक या सर्व वापरत असलेल्या मुद्रित आणि अमुद्रित वाचन साहित्याची यादी आपल्या शोधप्रबंधाच्या शेवटी वर्णक्रमाच्या रचनेनुसार देत असतो. यालाच संदर्भसूची Bibliography असे म्हणतात.

प्रत्येक लेखक आपल्या लेखनात आवश्यक तेथे आशयाशी संबंधीत असा संदर्भ तयार करीत असतो. प्रबंध आणि शोधनिबंध यामध्ये संशोधकाने व्यक्त केलेल्या विचारांना निश्चीत झालेल्या सिद्धांताचा आणि सुत्राचा संबंध असतो. संशोधनात उपयोजीलेल्या पद्धती आणि तंत्रे यांच्या पुष्ट्यर्थ प्रत्येक लेखक त्याच्या आधीच्या लेखकांचा आधार घेत असतो. त्याचप्रमाणे आधीच्या लेखकाची मते खोडून काढण्यासाठीच तो त्यांचा उल्लेख लेखनात करीत असतो.

3) संशोधन विषयाची निवड :

संशोधन विषय निश्चित झाल्यानंतरच संशोधन कार्याला प्रत्यक्ष स्वरूपात होत असते. संशोधन विषयाची वास्तविकता, सद्यस्थिती अभ्यासणे गरजेचे असते. सदर विद्यापीठात राज्यशास्त्र विषयात संशोधन झालेल्या संशोधनाची सूक्ष्म साधने जाणून घेण्यासाठी संशोधकाने “मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास” या विषयांची निवड संशोधनाकरिता करण्यात आली आहे.

संशोधनाचे शिर्षक :

“मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे विश्लेषण : एक अभ्यास”.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची स्थापना 23 ऑगस्ट 1958 रोजी झाली. मराठवाड्यामध्ये प्रामुख्याने अकृषी विद्यापीठे दोन असून त्यांची चार

जिल्ह्यात विभागणी झाली आहे. हे विद्यापीठ म्हणजे मराठवाडा प्रदेशांसह भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाल्यानंतरही या विद्यापीठाच्या स्थापनेसाठी लोकांना तब्बल दहा वर्षे वाट पाहावी लागली. मराठवाड्यातील तत्कालीन नेत्यांनी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी केलेल्या या पाठपुराव्याचा इतिहास आहे. छत्रपती संभाजी नगरला (औरंगाबाद) सुरू झालेली अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालये मराठवाडा विद्यापीठांशी संलग्नित झाल्यामुळे मराठवाड्यातील उच्चशिक्षणाच्या प्रसारास गती आली.

मराठवाडा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. एस. आर. डोंगरेकरी (1958-1964) यांनी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर तिस-या वर्षी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले. त्यानंतरचे कुलगुरू डॉ. नानासाहेब एस. आर. तावडे यांनी विविध विषयांच्या विभागांची संख्या 11 वरून 19 पर्यंत नेली. त्यांच्याच कारकीर्दीत विद्यापीठाचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या योगदानाचा त्यांना सन्माननीय डी.लीट. पदवी प्रदान करून विद्यापीठाने यथोचित गौरव केला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड :

गोदावरी नदीच्या काठावर वसलेले शहर म्हणजे नांदेड होय. त्याचप्रमाणे श्री. गुरू गोविंदसिंघजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नांदेड नगरीत 17 सप्टेंबर 1994 रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली आहे. नांदेड या विद्यापीठाची निर्मिती मराठवाडा विद्यापीठाच्या विभाजनातून झालेली आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे थोर सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव या विद्यापीठास देण्यात आले आहे. स्वामी रामानंद तीर्थ यांनी मराठवाडा स्वतंत्र होण्याअगोदर निजामाच्या राजवटीत असताना आपले शैक्षणिक व सामाजिक कार्य मोठ्या प्रमाणात केले होते. समाजात शिक्षणाची सुरूवात करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले होते. 17 सप्टेंबर 1948 रोजी निजामी राजवटीतून हैद्राबाद संस्थान मुक्त झाले. हैद्राबाद मुक्ती संग्रामात सहभागी

झालेल्या सैनीकाचे सतत स्मरण व्हावे यासाठी विद्यापीठाचे कल्पक कुलगुरू डॉ. जनार्धन वाघमारे यांनी 17 सप्टेंबर हा विद्यापीठाचा स्थापना दिवस ठरविला.

डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली जून 1995 पासून विद्यापीठाची शैक्षणिक वाटचाल सुरू झाली. या विद्यापीठाने सुरूवातीपासून विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानला व विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी नियोजनबद्ध असा शैक्षणिक कार्याचा आराखडा तयार केला. हा आराखडा तयार करत असताना केवळ मळलेल्या वाटेने न जाता 21 व्या शतकाची आव्हाने पेलू शकणारा विद्यार्थी घडवण्यासाठी विद्यापीठाने काही नव्या दिशा शोधण्याचा प्रयत्न केला. सदर विद्यापीठाचा एकूण परिसर 650 एकरमध्ये विस्तारलेला असून विद्यापीठ परीसराला ज्ञानतीर्थ हे नाव डॉ. जनार्दन वाघमारे यांनी दिले आहे.

4) संशोधन विषयाची गरज :

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयांमध्ये संशोधन करणा-या तसेच सामाजीकशास्त्रातील अन्य विषयांत संशोधन करणा-या संशोधकांना सदर संशोधन प्रबंधाआधारे उल्लेखांचे विश्लेषण कसे करण्यात येते या संदर्भात उपयुक्त माहिती मिळणार आहे. त्याप्रमाणे संशोधनाच्या दृष्टीकोनातून उल्लेखांचे महत्त्वदेखील लक्षात येवू शकेल.

5) महत्वपूर्ण संज्ञा :

उल्लेख विश्लेषण : उल्लेख विश्लेषण ही संदर्भ सुचीचा अभ्यास करण्याची सर्वात महत्त्वाची व जुनी पद्धती आहे. युगिन गारफिल्ड यांनी 1955 मध्ये उल्लेख विश्लेषणाबद्दल महत्वपूर्ण सहकार्य केले. ग्रंथमापनाच्या अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्रासाठी उल्लेख विश्लेषणामुळे साहित्यात मुख्यत्वे नियतकालिकातून झालेला विशिष्ट विषयांचा विस्तार, लेखकाच्या संदर्भ निर्मितीच्या रिती लेखकाचे उत्तरदायित्व,

उपभोक्त्यांची प्रत्यक्ष कार्यपद्धती आणि त्यायोगे कळून येणा-या त्यांच्या माहितीविषयक गरजा यांचा अभ्यास संख्यात्मक विश्लेषणाद्वारे करण्यात येतो.

6) संशोधनाची उद्दिष्टे :

1) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधाच्या संदर्भसूचीतील उल्लेखांचा शोध घेणे.

2) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधाच्या संदर्भसूचीतील उल्लेखांचे वाचनसाहित्य व माहिती साधनांच्या प्रकारानुसार वर्गीकरण करणे.

3) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील संदर्भसूची उल्लेखांचे भौगोलिक कालखंड व वर्षनिहाय स्थळ यांचा परामर्श घेणे.

4) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधामध्ये वापरण्यात आलेल्या संदर्भसूचीतील उल्लेखांची भाषानिहाय व लेखकनिहाय माहिती घेणे.

5) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधाच्या संदर्भाचे उल्लेखीत साहित्याची रँकलिस्ट तयार करणे.

6) उपविषयानुसार वर्गीकरण करणे.

7) प्राप्त डाटावर बिब्लिओमेट्रिक लॉजचे उपयोजन करणे.

7) संशोधनाची गृहीतके :

संशोधनात गृहीतके ही संशोधनाचा केंद्रबिंदू मानला जातो. संशोधन पूर्ण होण्याआधीच जी संभाव्य उत्तरे धरली जातात त्यास गृहीतके संबोधले जाते. प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे गृहीतके निश्चित केली आहेत.

1) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधात मोठ्या प्रमाणात संदर्भ उल्लेख देण्यात आलेले आहेत.

2) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठात सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचे वाचनसाहित्य तसेच माहिती साधनाच्या प्रकारानुसार वर्गीकरण करता येते.

3) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखांचा भौगोलिक स्थानानुसार व कालखंडानुसार उपयोग करण्यात आला आहे.

4) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेख विविध भाषेतील व एक, दोन, तीन व तीनपेक्षा अधिक लेखक योगदान प्रकारातील आहेत.

5) मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयांतील पीएच्.डी. प्रबंधातील उल्लेखीत साहित्याची रँकलिस्ट तयार करता येते.

8) संशोधन पद्धती :

संशोधन हा शब्द इंग्रजी भाषेतील Research या इंग्रजी शब्दासाठी मराठी शब्द आहे. Research चा भाषीक अर्थ असे व्यक्त करतो की, एखाद्या हरविलेल्या वस्तूचा शोध घेतला परंतु ती मिळाली नाही म्हणून तिचा पुन्हा शोध घेण्याची प्रक्रिया आहे.

एल. व्ही. रोडमन यांच्या मते नवीन ज्ञानप्राप्तीच्या व्यवस्थीत प्रयत्नाला आपण संशोधन असे म्हणतो.

वर्णनात्मक संशोधन पद्धती :

वर्णनात्मक संशोधन पद्धत हे एक स्थूल वर्गीकरण आहे. यामध्ये विशिष्ट तंत्रे पद्धतीचा प्रक्रियांचा समावेश होतो. अभ्यास वस्तूचा स्तर, दर्जा स्पष्ट करणे हा सर्वांचा

समान हेतू असतो. वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये सर्वसाधारणपणे परीकल्पना मांडणे व ती तपासणे ही प्रक्रीया होते. संशोधन कार्य करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

9) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तूत संशोधनाची व्याप्ती ही मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांमधील शोधगंगा या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या राज्यशास्त्र या विषयांत पीएच्.डी. साठी सुरूवातीपासून ते जुलै 2023 पर्यंत उपलब्ध झालेल्या प्रबंधापूरती मर्यादित आहे.

10) माहिती संकलन साधने व तंत्रे :

मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र पीएच्.डी. प्रबंधाचे संदर्भसूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत राज्यशास्त्र या विषयांत शोधगंगा या संकेतस्थळावरील उपलब्ध असलेल्या पीएच्.डी. प्रबंधाचे संदर्भ सूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.

11) माहिती विश्लेषण :

मराठवाड्यातील अकृषी विद्यापीठांत सादर केलेल्या राज्यशास्त्र या विषयात पीएच्.डी. प्रबंधाचे संदर्भसूचीच्या सहाय्याने माहितीचे संकलन केल्यानंतर शास्त्रीय पद्धतीचा आधार घेऊन माहिती विश्लेषण करण्यात येणार आहे.

12) प्रकरणाची रचना :

प्रकरण पहिले - प्रस्तावना

या प्रकरणात मुलभूत माहिती व संशोधनासाठी वापरावयाची संशोधन पद्धती याबाबतचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - पूर्व साहित्याचा आढावा

या प्रकरणात प्रस्तावित संशोधन विषयासंबंधीत ग्रंथ, नियतकालिके तसेच डिजीटल माध्यमांतील वाचनसाहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - माहिती संकलन

या प्रकरणांत संबंधित माहितीचे संकलन व मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - माहितीचे विश्लेषण

या प्रकरणात संशोधनातून आलेल्या माहितीचे विश्लेषण सादर करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात संशोधनातून आलेले निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात येणार आहेत.

13. संदर्भ :-

1) आगलावे, प्रदीप 2000, सामाजीक पद्धती शास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकाशन, पृ. 214.

2) क-हाडे, बी. एम. 2007, शास्त्रीय संशोधन पद्धती नागपूर : पिंपळापूरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, पृ. 576.

3) जोशी, स्मिता 2007, राज्यशास्त्र, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, पृ. 474.

4) पाटील, वा. भा. 1998, संशोधन पद्धती, पूणे : श्री मंगेश प्रकाशन, पृ. 128.

5) www.bamu.ac.in

6) https://srtmun/ac.in

7) https://shodhganga.inflibnet.ac.in>moredetails>about

8) कायंदे पाटील, ग. वि. 2009, संशोधन पद्धती, नाशिक : चैतन्य पब्लिकेशन.

9) निकोसे, एस. 2007, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.

10) कुंभार, राजेंद्र 2015, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

11) Nighot, Shakuntala (2019), Citation analysis of PhD theses in education in two state universities of Maharashtra, SHPT School of Library Science, thesis submitted in SNDT Women's University. http://hdl.handle.net/10603/312092

12) https://en.wikipedia.org/wiki/Citation_analysis accessed on 07/09/2023

13) https://www.merriam-webster.com/dictionary/journal accessed on 07/09/2023

14) https://en.wikipedia.org/wiki/Bibliometrics accessed on 07/09/2023

15) https://marathivishwakosh.org accessed on 07/09/2023

16) https://www.collinsdictionary.com/dictionary/english/bibliometrics accessed on 07/09/2023

संशोधक
डेंगळे हरिश्चंद्र रावसाहेब

मार्गदर्शक
डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती
प्राचार्य
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंडे कला महाविद्यालय,
गंगाखेड ता. गंगाखेड, जि. परभणी